# मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा द्या !


MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात


संभाजीनगर – मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी अशी मागणी मराठा संघटनेकडून करण्यात आली. त्यासाठी मराठा संघटना आक्रमक झाल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या जिजाऊ चौकात मराठा क्रांती मोर्चातर्फे आंदोलन करण्यात आले.

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी गावामध्ये ड्रोन फिरत आहेत. त्यामुळे अंतरवाली सराटीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचे पडसाद मंगळवारी विधानसभेत उमटले. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे यांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी सभागृहात केली होती. दुसरीकडे आता मराठा संघटना आक्रमक झाल्या आहेत. मराठा संघटनांनी मनोज जरांगे यांना झेड प्लस सुरुक्षा देण्याची मागणी केली आहे. त्यासाठी छत्रपती संभाजीनगरात आंदोलन केले. अंतरवली सराटी या गावावर ड्रोनने टेहळणी होत असल्याचे वृत्त आले आहे. त्यानंतर मराठा समाजात आणि राज्यातील राजकारणातून मनोज जरांगे पाटील यांच्या जीवाला धोका असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. ड्रोनद्वारे टेहाळणीचे प्रकार कोण करत आहे, कशामुळे ही टेहळणी केली जात आहे? असे प्रश्न निर्माण झाले आहे. परंतु या प्रकारामुळे अंतरवाली सराटीमधील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मनोज जरांगे यांच्या जीवाला धोका असल्यामुळे मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरच्या जिजाऊ चौकात मराठा क्रांती मोर्चातर्फे आंदोलन करण्यात आले. त्या आंदोलनात अनेक पदाधिकारी सहभागी झाले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी मनोज जरांगे यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे.




| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२८० | बुधवार दि.०३ जुलै २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -280 | WEDNESDAY DT. 03 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


# बीड पोलिस प्रशासन जिल्ह्यातील नेत्यापुढे किती झुकतंय, कॉल रेकॉर्डिंग व्हायरल होताच कुंडलिक खांडेना अटक का?












- दोन महिन्यात अनेकदा प्रचारात बीड जिल्हा पोलिसाना कुंडलिक खांडे दिसत नव्हते का पालकमंत्री, एसपी, पीआय बटेवाड यांनी उत्तर द्यावे.?
- बीड जिल्ह्याचे राजकारण गलिच्छ झाले कोणाचा जीव गेला किंवा नाही गेला आपलं राजकारण झालं पाहिजे ही भूमिका बीड जिल्ह्यातील राजकीय नेत्यांची?
- भाजपचा जिल्हाध्यक्ष कुंडलिक खांडे होणार होता म्हणून राजेंद्र मस्केला पद जाणण्याची भीती होती. राजेंद्र मस्के, देविदास नागरगोजे सलीम जहांगीर मुन्नाफड यांनी फेसबुक पोस्ट करून कुंडलिक खांडेला आमचा विरोध होता हे सिद्ध केलं?

बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासन किती जुकतंय हे जिल्यातील नेत्यांनी जनतेला दाखवून दिले आहे कारण भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचार्थ खुलेआम शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख कुंडलिक खांडे हे ताई सोबत प्रचार करत फिरत होते तेव्हाही कुंडलिक खांडे यांच्यावर बीड ग्रामीण पोलीस स्टेशनला ३०७ सह इतर गुन्हे दाखल होते तरीही या कुंडलिक खांडेना बीड पोलीस किंवा स्थानिक गुन्हे शाखेचे कुठलेच अधिकारी कुंडलिक खांडे यांना अटक करत नव्हते याचे कारण हे बीडच्या जनतेला समजले आहे.ज्याच्या मागे पंकजाताई, धननंजय मुंडे यांचा हात असेल तर त्याला बीड पोलीस काय कोणीच अटक करू शकत नाही हे बीड पोलिसांनी सिद्ध करून दाखवले आहे.?

कायदा हा सर्वांना सारखा आहे परंतु तसे नसून कायदा हा गोरगरीबासाठीच आहे असे दिसून येत आहे.तसेच कुंडलिक खांडे यांची कॉल रेकॉर्डिंग पंकजाताई ना इलेक्शन ला सपोर्ट न करता, बजरंग बप्पा सोनवणे यांना सपोर्ट केला आहे अशी कॉल रेकॉर्डिंग व्हायरल होताच या धनंजय मुंडे व पंकजाताई यांनी लगेंच कुंडलिक खांडे यांना ३०७ च्या गुन्ह्यात अटक करण्यास सांगितले याचा अर्थ असा होतो जोपर्यंत आमच्या सोबत आहात तर तुम्हाला कोणीही अटक करणार नाही जर आमच्या विरोधात जाल तर बीड पोलिस आमच्या पुढे किती जुकतंय हे आम्ही दाखवून देऊन हे खांडे यांना अटक केल्यामुळे सिद्ध होत आहे.?

## जनतेच्या मनातील प्रश्न ?

- माझा भाऊ माझा भाऊ म्हणून कुंडलिक खांडेला जाहीर सभेत सांगणाऱ्या पंकजा मुंडे धनंजय मुंडे कॉल रेकॉर्डिंगवर बोलावं
- धनंजय मुंडे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी स्टेजवर खुलेआम फिरणाऱ्या कुंडलिक खांडेला कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाल्यास अटक का पोलीस प्रशासन, पालकमंत्र्यांसह उत्तर द्यावं.?
- पंकजाताई प्रीतम ताईला आता भाऊ दिसा का दिसनां.?
- स्वतःच्या जातीसाठी लढणं ही काय प्रत्येक जाती-धर्माच्या लोकांचा अधिकार मग यात चूक किंवा गैर काय? दोन महिन्यापूर्वीच कारवाई व्हायला होती ग्रामीण पोलीस स्टेशनला कुंडलिक खांडे कसे सापडत नव्हते पी आय बंटीवाड यांच्यावर
- कोणाचा दबाव होता का?
- कुंडलिक खांडे च्या नावावर मराठ्यांचे मत मागण्याचा अधिकार भाजप पदाधिकाऱ्यांना कोणी दिला त्यावेळेस कुंडलिक खांडे चुकतंय
- हे भाजपला दिसले नाही का
- बीड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक बंटेवाड यांच्या बीड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये नंगानाच हाणामाऱ्या खून दरोडे अॅट्रॉसिटी दारू गुटखा पत्त्याचे क्लब जोरात गुन्हेगाराला अभय?
- सत्तेचा गैरवापर पोलीस प्रशासनावर कसा होतोय हे कुंडलिक खांडे यांना अटक केल्यानंतर उघडपणे जनतेला दिसले खांडेच्या भावकीच्या भांडणात भाजपचे राजेंद्र मस्के देविदास नागरगोजे मुन्ना फड या पदाधिकाऱ्यांनी तेल टाकलं
- फेसबुक वर पोस्ट करण्यापेक्षा राजेंद्र मस्के नागरगोजे मुन्ना फड यांनी आत्मपरीक्षण करावे ताईच्या पराभवाचे.

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा च्या राजकारणामध्ये जातीचा राजकारण पेटत असताना ओबीसी मराठा वाद हा खुल्या गेल्या अनेक वर्षांपासून पाहायला मिळत आहे मराठा आरक्षणाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आक्रमक पवित्राने मराठा समाज घडघडून जागा झाला आहे. मराठा समाजाची पाहून राजकीय पक्षांचे सर्वांचेच धाबेदनानले असतानाच मात्र बीड जिल्ह्यातील राजकारणाला वेगळी दिशा मिळालेली आहेत. सर्वात जास्त महाराष्ट्रामध्ये जरांगे फॅक्ट हा बीड जिल्ह्यामध्ये चालला आहे. आणि याच कारण त्यामुळे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे या बीड लोकसभेत २०२४ उमेदवार होत्या. पण पंकजाताई मुंडे यांचा अवघ्या ६००० मतांनी पराभव झालेला आहे. या म्हणजे कुंडलिक खांडे चीकॉल रेकॉर्डिंग हेच एकमेव कारण आहेत का हेही तपासणी खूप गरजेचे आहे.?

कारण बीड जिल्ह्यातील राजकारणामध्ये कुंडलिक खांडेला भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष म्हणून पंकजाताई मुंडे व प्रीतम ताई मुंडे यांनी पसंती दिली होतीह याच भाजपाच्या जिल्हाध्यक्ष पदावरती कुंडलिक खांडे जर बसला तर आपलं काही खरं नाही अशी भीती यावेळी भाजपाचे विद्यमान जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के भाजपाचे चंद्रकांत फड,देविदास नागरगोजे या लोकांना होती. परंतु या लोकांनी काम करत असताना कुंडलिक खांडे ची कुठेतरी काही चूक आपल्याला आढळते का त्या चुकी आधारित कुंडलिक खांडेला घेरण्याचे काम यावेळी भाजपमधून होत आहे.

का तर ही रेकॉर्डिंग व्हायरल करण्यामध्ये सुद्धा भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांचा सहभाग असल्याची ही चर्चा मी शहरांमध्ये जोर धरत आहे.? परंतु ही चर्चा जोरधरत असताना भाजपच्या राजेंद्र मस्के देविदास नागरगोजे मुन्ना फड यांच्याकडे मात्र ही रेकॉर्डिंग गेल्या १५ ते २० दिवसापासून म्हणजेच निकालाच्या अगोदर पासून होती ही रेकॉर्डिंग त्यांनी त्यावेळेस का व्हायरल केली नसेल तर कुंडलिक खांडे याच्यावरती दबाव आणून नेमकं वरील मंडळींना काय साध्य करायचे होते हे स्पष्ट होणे गरजेचे आहे? .

कुंडलिक खांडे यांच्या कॉल व्हायरल रेकॉर्डिंग नंतर भाजपातील मुन्ना फड,सलीम जहागीर या पदाधिकाऱ्याने मात्र एक एक फेसबुक पोस्ट करत विश्वासाला तडा गेला म्हणून त्या ठिकाणी लिहिले आहे. परंतु पंकजाताई मुंडे यांना पाडण्यामध्ये मात्र यावेळी राजेंद्र मस्के देविदास नागरगोजे मुन्ना फड सलिम जहागीर यांचा सिंहाचा वाटा आहे. कारण यावेळी त्यांनी मात्र कुंडलिक खांडे याच्या सोबत खाण उठणं बसणं व राजकारणाच्या गोष्टी या सर्व गोष्टींमध्ये कुंडलिक खांडे च्या पुढे पुढे बापू बापू म्हणून मिरवणाऱ्या वरील चार ते पाच जणांनी आत्मपरीक्षण करावे. कारण याच पाच जणावरती भाजपा जिल्हा प्रचार कार्यालयाची धुरा होती पंकजाताईंना निवडून आणण्याची सर्व व्यवहार व सर्व कामाच्या जिम्मेदारी ही चार लोकांवर होती. परंतु यांनी अरेरवीची भाषा वापरल्यामुळे व छोट्या छोट्या समाजातील कार्यकर्त्यांना त्रास दिल्यामुळे पंकजाताई मुंडे यांचा पराभव घ्या काही मताने झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. तरी पंकजाताई मुंडे यांनी उद्या भविष्यात आमदार मंत्री होत असताना या चांडाळ चौकडीला दूर करावं व निष्ठावंतांना कार्यकर्ते याना न्याय द्यावा. आपल्या गाडीत बसवत असताना वरील चार ते पाच जणांना पंकजाताई मुंडे यांनी जर बसवलं तर पंकजाताई मुंडे यां सर्वांना खतपाणी घालतील का अशीही चर्चा यावेळी बीड ग्रामीण सह बीड जिल्हा भाजप मधील पदाधिकाऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.?

कुंडलिक खांडेच्या भावकीच्या भाडनात बीड भाजप पदाधिकारी तमाशा बघून हसत आहे.?

बीड जिल्ह्यातील मराठा समाजासाठी किंवा मराठा समाजाच्या बाजूने जर कुंडलीक खांडे आपल्या समाजासाठी लढत असेल तर त्यामध्ये कुंडलिक खांडेची चूक आहे का? पंकजाताई मुंडे यांच्यासोबत फिरत असताना आणखीन सुद्धा दुसऱ्या काही कार्यकर्त्यांनी मराठ्या समाजात उमेदवार निवडून यावा असा हट्ट यावेळी ग्रामीण भागामध्ये धरला होता. यामध्ये पंकजाताई मुंडे यांच्या भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व त्यांचे नातेवाईक यांनी मात्र पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात भाजपमध्ये राहून काम केलेले हे बीड भाजपला दिसत नाही का फक्त कुंडलीक खांडेची रेकॉर्डिंग व्हायरल झाल्यामुळे दिसत आहेत. तर भावकीच्या भांडणांमध्ये जर बीड भाजप पदाधिकारीला फक्त तमाशा बघायचा असेल तर यावेळी हा तमाशा मराठा समाज बघून घेणार नाही अशीही चर्चा मराठा समाजामध्ये येत आहे. मराठा समाजामध्ये कुंडलिक खांडे यांच्या अटकेमुळे आज तीव्र संताप व्यक्त होत. असतानाच मात्र बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांना राजकारण करायचे नाही का असाही सवाल यावेळी मराठा समाजाकडून करण्यात येत आहे? परंतु यावेळी मात्र बीड भाजपचे राजेंद्र मस्के देविदास नागरगोजे मुन्ना फड सध्या तमाशा तमाशा बघत असताना हसी मजा करून करण्यामध्ये व्यस्त आहेत.?

# अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपत केला वाढदिवस साजरा

## जि.प.चे आदर्श शिक्षक अशोक नावंदे यांचा स्तुत्य उपक्रम



परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील संगम जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री अशोक नावंदे यांचा वाढदिवस आज बुधवार दिनांक ३ जुलै रोजी विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. जि.प.प्राथमिक शाळा संगम येथे वृक्षारोपण तसेच प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यांना शालेय साहित्य वही पेन खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला.केले. शाळेतील विद्यार्थी व शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. शाळेच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न व मदत केली जाईल. तसेच सर्वांनी वाढदिवस साजरे करताना समाजिक उपक्रम राबवावेत अशी मनोकामना श्री अशोक नावंदे यांनी व्यक्त केली.

बीड जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक तथा जि प प्रा शा संगम शाळेचे मुख्याध्यापक अशोक नावंदे हे आपला वाढदिवस दरवर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून करत असतात. त्याचप्रमाणेच आज दि ३ जुलै २०२४ रोजी ही त्यांनी स्वतःचा वाढदिवस इतर कुठलाही खर्च न करता विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून साजरा केला . दरम्यान या शाळेतील सर्व शिक्षकही आपला वाढदिवस अशाच प्रकारे इतर बाबीवर खर्च न करता शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून करत असतात.

विद्यार्थीही अशा उपक्रमामुळे शिक्षकांच्या वाढदिवसाची आठवण ठेवतात एवढेच नाही तर विद्यार्थीही आपल्या परिसरातील मिळणाऱ्या फुले , पाने यापासून पुष्पगुच्छ तयार करून आणतात व शिक्षकांचा आपुलकीने वाढदिवस साजरा करतात तसेच शाळेच्या वतीनेही विद्यार्थ्यांना वही, पेन, चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचाही वाढदिवस नियमितपणे साजरा केला जातो. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.या सर्व उपक्रमात शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षिका श्रीमती कल्पना बडे मॅडम, श्रीम.बबिता शिंदे मॅडम यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.



## आदित्य कृषि महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थ्यांनी कृषि दिनानिमित्त दहिफळ गावात राबविले विविध उपक्रम

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या, जि.बीड आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिदूत अभिषेक गरड, ओम शेंडे, अनिकेत पीसोळे, विवेक झगडे, गौरव तारळकर, संघर्ष शिंदे, किरण चौंडिये, शुभम सलगर यांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत दहिफळ येथे विविध प्रकारच्या वृक्षाची लागवड केली,वृक्ष लागवडीच्या दरम्यान कृषिदुत्तानी गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचे महत्व पटवून दिले व झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला .तसेच या कार्यक्रमादरम्यान जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची भव्य रॅली काढण्यात आली व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले . या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा मॅडम आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तांबे सर, सानप सर जागरूकता कार्यानुभव समन्वयक डॉ. संदीप मोरे सर, कार्यक्रम अधिकारी प्रा. शिंदे सर व इतर प्राध्यापक विषय तज्ञ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमादरम्यान गावातील सरपंच देविदास राऊत ,उपसरपंच रामेश्वर काळे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.



## बहुजन जनता पक्ष अहिल्यादेवी नगर जिल्हा अध्यक्ष पदी सुनील रोकडे यांची निवड.

आज रोजी माननीय बालाजी घुमाडे साहेब बहुजन जनता पक्ष संस्थापक अध्यक्ष यांनी अहिल्यादेवी नगर या जिल्ह्याची मोठी जबाबदारी माझ्यावरती सोपवलेले आहेत जे माझी अहिल्यादेवी नगर जिल्हा अध्यक्ष पदी निवड केली आहे या निवडीचे मी नक्कीच तळागाळातील समाजापर्यंत पक्षाचे विचार व पक्ष वाढीचे काम करीन व पक्ष वाढीला जेवढा जास्त वेळ देता येईल तेवढा जास्त वेळ देईल व मी आज दिनांक ०२/०७/२४ या रोजीपासून बहुजन जनता पक्ष या पक्षाचे काम पूर्णपणे जोरात सुरू केले आहे या निवडीबद्दल उपस्थित आजिनाथ (गुरु)खेडकर पोपट रोकडे सरपंच भालगाव. सचिन रोकडे. मल्हारी रोकडे. संतोष रोकडे. अनिल रोकडे. बबन रोकडे. विठ्ठल कांबळे. नागेश रोकडे महादेव पवळे शिवाजी गायके

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची एक ऑगस्टपर्यंत मुदत वाढ देण्यात यावी बहुजन अधिकारांदोलनाची मुख्यमंत्र्यांना विनंती

नुकतीच महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केलेली आहे. सदर योजना ही महाराष्ट्रातील सर्व जाती धर्मातील महिलांचे जीवनमान उंचवणारी आहे. परंतु योजना अत्यंत उपयुक्त असूनही मात्र या योजनेचा फार्म दाखल करण्याचा अवधी अत्यंत कमी आहे सदर योजना तळागाळातील महिला ंना माहीत होण्यासाठी व योजनेस लागणारे कागदपत्र काढण्यासाठी काढण्यासाठी खूपच वेळ कमी आहे या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक प्रश्न बऱ्यापैकी सुटणार आहेत आजही ग्रामीण भागामध्ये महिलांना घरातील अडीअडचणीला कर्त्या पुरुषावरती अवलंबून राहावे लागते वेळ प्रसंगी त्यांना आपल्या आर्थिक गरजा भागवताना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे सदर योजनेच्या माध्यमातून थेट महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा होणार असून त्यामुळे महिलांना आपल्या हक्काचे पैसे त्यांना मिळणार आहेत महाराष्ट्र शासनाने सदर योजनेच्या माध्यमातून गोरगरीब महिलांचा सन्मान व स्वाभिमान वाढवण्याचा खूप मोठा निर्णय घेतलेला आहे परंतु आजही ग्रामीण भागातील महिलांना व त्यांच्या कुटुंबांना या योजनेबाबत बऱ्यापैकी माहिती होणे व सदर योजनेसाठी लागणारे कागदपत्र काढण्यासाठी जाहीर केलेल्या योजनेप्रमाणे खूपच कमी अवधी दिसत आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्री साहेब महाराष्ट्र राज्य यांना आमची विनंती आहे की सदर योजनेचा अवधी एक ऑगस्ट करण्यात यावा अशी मागणी बहुजन अधिकारांदोलनाचे संस्थापक अध्यक्ष राम शेंडगे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे महाराष्ट्र शासनाकडे केलेली आहे सदर योजना गोरगरीब महिलांना याचा लाभ होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने याचा गांभीर्याने विचार करावा


# माझी लाडकी बहिणयोजनेची महिलांची लुट थांबवा, सर्व समाजाच्या महिलांनी योजनेचा लाभ घ्यावा - शेख रशिद

## माजलगाव एमआयएम पक्षातर्फे फ्रि फार्म भरुन देणार

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य सरकारने चालू केलेली माझी लाडकी बहिण योजनेची अंमलबजावणी करतांना सेतु केंद्र, ऑनलाईन दुकानात आलेल्या महिलांना कागदपत्रे, नियम अटी दाखवुन ५००,६०० रुपयांची लुट करण्यात येत आहे त्यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कारवाई करुन सेतु केंद्र,ऑनलाईन दुकानांवर कारवाई करावे अशी मागणी एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी साहेबांना ई-मेल द्वारे केली आहे.

सरकारने सुरू केलेल्या माझी लाडकी बहिणयोजनेची दुरूस्ती करून ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची तारीख १५जुलै ऐवजी ३१ ऑगस्ट २०२४ करण्यात आली आहे तसेच योजनेची ५ एक्करची अट रद्द करण्यात आले आहे.महिलांची वयोमर्यादा २१वर्ष ते ६५ वर्ष करण्यात आले आहे तसेच ज्या कुटुंबाकडे पिवळे किंवा केसरी राशन कार्ड असेल त्यांना उत्पन्नाच्या प्रमाणपत्रातुन सुट देण्यात आली आहे व डोमेसाईल सर्टिफिकेट (अधिवास प्रमाणपत्र)ची अट रद्द करण्यात आली आहे त्यामुळे सर्व समाजाच्या महिलांनी एक रुपया न घेता माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घ्यावा तसेच प्रशासनाने सेतु केंद्र, ऑनलाईन दुकानांवर तक्रारी भेटल्यास तात्काळ दखल घेऊन कारवाई करावे व माजलगाव एमआयएम पक्षातर्फे पुर्ण कागदपत्रे सादर केल्यास ऑनलाईन फार्म मोफत भरु देण्यात येईल अशी



माहिती एम आय एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी सांगितले आहे.

# मनोज जरांगे पाटील यांना पार्थ पवारांसारखी वाय दर्जाची सुरक्षा द्या.:- पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

**संघर्ष योध्दा मा.श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांच्या सुरक्षेचा प्रश्न सध्या ऐरणेवर आला आहे. कालची झालेली जी घटना आहे.त्या घटनेत एखादा समाजाचा नेता आपल्या घरी असतांना त्यांच्या घरावरुन ड्रोन कैमेरा फिरतो. आणि तो कोणाचा होता हे माहित नसण ही बाब सुरक्षेच्या दृष्टीने घातक आहे.**

आज मनोज जरांगे पाटील म्हणजेच महाराष्ट्रातील करोडो मराठा समाजाचे दैवत असल्याची प्रतिमा निर्माण झाली असून त्यांना काही हानी पोहचल्यास महाराष्ट्राचं वातावरण बिघडणार नाही याची हमी काय ? तसेच सामाजिक बांधिलकी जोपासत लोकशाही मार्गाने समाजाच्या हिताचा लढा देण्याऱ्याची सुरक्षा करणे हे आपल्या घटनेत नमुद असून अशा लोकांची सुरक्षा ही हितकर ठरते. याच्यासाठी सामाजिक सलोखा आबाधित ठेवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांची सुरक्षा ही महत्त्वाची ठरते. म्हणून त्यांना वाय दर्जाची सुरक्षा देण्यात यावी अशी नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पॅंथर सेना, वशीम भाई शेख, सचिव, कावेरी जाधव महीला शहर अध्यक्ष, दयाबाई वाघमारे यांची मागणी आहे.





## काल अर्ध्यारात्री मोमीन पुरा कुरेशी मोहल्ला या ठिकाणचा विद्युत पुरवठा खांबावरील केबल तुटल्यामुळे खंडित झाला होता

या बाबत सदरील माहिती वाजेद जावेद कुरेशी यांना मिळताच त्यांनी तात्काळ विद्युत वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना याची कल्पना देत त्यांनी ही तत्काळ प्रतिसाद देत कामास सुरवात केली आणि तुटलेले केबल जोडून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला.यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते,आदरणीय जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली समाजसेवेचे हे कार्य असेच सुरू राहणार आहे जनतेसाठी सदैव तत्पर वाजेद जावेद कुरेशी

# शिक्षणातूनच राष्ट्रनिर्मिती - माजी मंत्री सुनील केदार



## संत गमाजी महाराज शिक्षण संस्थेद्वारा गुणवंत विध्यार्थी सत्कार सोहळा

आजच्या विद्यार्थ्यांचा बुध्यांक खूप मोठा आहे फक्त गरज आहे त्याला योग्य चालना देऊन शिक्षण देण्याची शिक्षणातूनच खऱ्या अर्थाने राष्ट्राची निर्मिती होते. अलीकडच्या सरकारचं धोरण हे विद्यार्थी विरोधी असून आपण काल सादर झालेला राज्याचा अर्थसंकल्प पाहिला तर त्यात शिक्षणासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने काहीच तरतूद केलेली दिसून येत नाही ही शोकांतिका आहे असे विचार भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री सुनील केदार यांनी हिंगणा येथील संत गमाजी महाराज शिक्षण संस्थेद्वारा आयोजित वर्ग दहावी व वर्ग बारावीतील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्या प्रसंगी व्यक्त केले. पुढे बोलताना केदार यांनी शिक्षकांनी जेवढं जास्त ज्ञान देता येईल तेवढं जास्त ज्ञान देऊन विद्यार्थी घडवा कारण या राष्ट्राची निर्मिती करण्याची संधी शिक्षकांना मिळाली आहे असे म्हणाले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष रमेशचंद्र बंग होते. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सुप्रसिद्ध वक्ते बाळासाहेब कुलकर्णी तर प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते दिनेश बंग, जिल्हा परिषद सदस्य दुधाराम सव्वालाखे , राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष योगेश सातपुते, हिंगणा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बबनराव आव्हाळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वानाडोंरी शहराध्यक्ष हरिभाऊ रसाळ, पंचायत समिती सदस्य पौर्णिमा दीक्षित, संस्थेचे कोषाध्यक्ष महेश बंग, संस्थेच्या उपाध्यक्ष अरुणा बंग, सुशील दीक्षित आदी प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना संबोधित करताना बाळ कुलकर्णी यांनी गुणपत्रिका की गुणवत्ता या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी योग्य संगतीने गुणपत्रिकेतील गुणांपेक्षा जीवनात गुणवत्ता निर्माण करावी असे विचार मांडले तर अध्यक्ष स्थानावरून बोलताना माजी मंत्री रमेशचंद्र बंग यांनी हिंगणा तालुक्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हेच ध्येय बाळगून संस्था उभी केल्याचे सांगितले.

यावेळी हिंगणा तालुक्यातील मराठी माध्यमातून प्रथम आलेली शाळेची विद्यार्थिनी अपेक्षा सोमनकर ९६.६०% व इंग्रजी माध्यमातून प्रथम आलेला स्व देवकीभाई बंग इंग्रजी माध्यम विद्यालयाचा विद्यार्थी भावेश निवांत ९६% गुण तर नेहरू कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी सुशांत राजपूत जेईई च्या परीक्षेत देशातून ९५६ वा क्रमांक प्राप्त करून आयआयटी खडकपूर येथे प्रवेश मिळवला यांच्यासह हिंगणा तालुक्यातील २०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनेश बंग यांनी केले सूत्रसंचालन आनंद महल्ले तर आभार संस्थेचे उपाध्यक्ष अरुणा बंग यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वी ते करिता स्व देवकी बाई बंग विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नितीन तुपेकर ,नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शशिकांत मोहिते

### टीसी हरवला आहे

कोमल बाबू घडसिग या नावाचा इयत्ता दहावी पासचा टिसी हरवला आहे. सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
धानोरा रोड, बीड ता.जि.बीड

# संत वीरशैव कक्कय्या समाजाचे राज्यव्यापी धरणे आंदोलन मुंबईत संपन्न !

## कोण म्हणतं देणार नाही, घेतल्या शिवाय राहत नाही ;आझाद मैदानावर जोरदार घोषणाबाजी

मुंबई । प्रतिनिधी

संत वीरशैव कक्कय्या समाजासाठी शासकीय आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे.या मागणीसाठी शुक्रवार दि २८ जून रोजी मुंबईतील आझाद मैदानावर सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संत वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळ मुंबई व महाराष्ट्र राज्यातील ढोर समाजाच्या वतीने राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाला संपूर्ण राज्यातील जिल्हा व तालुक्यातून कानाकोपऱ्यातून ढोर समाज बांधव मोठ्या हजारोच्या संख्येने या आंदोलनास उपस्थित होते.यावेळी राज्यभरातून आलेल्या आंदोलकांनी राज्य सरकारच्या विरोधात कोण म्हणतं देणार नाही घेतल्या शिवाय राहत नाही, संत कक्कय्या महाराज की जय,ढोर समाजाचा विजय असो,या जोरदार घोषणानी आझाद मैदान दणाणून गेला.आणि या राज्य सरकारास आंदोलनाच्या माध्यमातून वेठीस धरण्यात आले. याचबरोबर समाजातील विविध भागातून आलेल्या ढोर समाज बांधवांनी स्वतंत्र शासकीय आर्थिक विकास महामंडळ जो पर्यंत संत कक्कय्या समाजास शासन देणार नाही तोपर्यंत हा लढा असाच सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.आंदोलनात महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय होती. भर पावसातही संत कक्कय्या समाजातील बांधव एकजूट होऊन आंदोलन स्थळी उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली आंदोलनाची दखल**

संत कक्कय्या समाजाने आर्थिक विकास महामंडळासाठी पुकारलेल्या राजव्यापी आंदोलनास आमदार गणेश नाईक व माजी आमदार बाबुराव माने यांनी भेट घेऊन आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. तसेच अनुसूचित यादीमधील अनुक्रम १८ नुसार ढोर , डोहोर, कंकय्या आणि कक्कय्या जातीसाठी स्वतंत्र शासकीय आर्थिक विकास



महामंडळ ,शासनाने स्थापन करावे ह्या प्रमुख मागणीसहित इतर मागण्यांबाबत विविध गाव,तालुका,जिल्हा येथील सहभागी झालेल्या सर्व बांधवांचा प्रचंड समुदाय आणि त्याचा आक्रोश पाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आंदोलनाची दखल घेतली.

दरम्यान वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळाचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी विधान भवन दालनात गेले. या शिष्टमंडळात वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळ मुंबई अध्यक्ष महादेव शिंदे, सचिव यशवंत नारायणकर, प्रवक्ते यशवंत शिंदे, सहसचिव सूर्यकांत इंगळे,वीरशैव कक्कय्या समाज मंडळ पुणे अध्यक्ष हनुमंत सोनवणे,समस्त कक्कय्या महासंघ मुंबई निवृत्ती सावळकर ,कक्कय्या समाज संभाजीनगर अध्यक्ष राजकुमार सोनावणे, कक्कय्या समाज पदाधिकारी संभाजीनगर सोनोपंत कावळे, कक्कय्या समाज पदाधिकारी संभाजीनगर दिग्विजय शेरखाने, बहुद्देशीय ढोर समाज डोंबिवली मंडळ अध्यक्ष अशोक कटके,भाजपा अनुसूचित जाती मोर्चा सचिव गोविंद खरटमल, पत्रकार दत्ता खंदारे,पत्रकार अमोल धडके,पत्रकार गणपत शिंदे,हेमंत शेरखाने,सुनील शिंदे म्हसवड,गणेश नारायणकर कोल्हापूर,कॉंग्रेस राज्य सदस्य प्रतीक्षा ताई सोनवणे,विश्वनाथ सोनवणे मिरज,दीपक सावळकर,यांचा सहभाग होता. आमदार ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घडवून सांगितले की संत वीरशैव कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ शासनाने स्थापन करावे व ढोर समाजाचे इतर मागण्या मान्य कराव्यात अशी व्यथा समाजाच्या वतीने आमदार यांनी केले.यावेळी मुख्यमंत्र्यांनी शांतपणे सर्व गोष्टी ऐकून घेतले. तसेच माझ्या वतीने शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नेमणूक करत आहे.ते तुमचे समस्या जाणून घेतील.आणि मला सांगतील यावेळी दीपक केसरकर यांनी भेट झाली त्यांना कक्कय्या मागण्याबाबत ४ पानी निवेदन देण्यात आले.तुमच्या मागण्याबाबत या अधिवेशन मध्ये १० जुलै २०२४ रोजी आर्थिक नियोजन समितीची बैठक असणार असून त्यामध्ये हा विषय घेऊन वरच्या सभागृहात मंजूर करून अधिवेशनाच्या अतीम दिवशी १२ जुलै २०२४ रोजी याबाबतची घोषणा केली जाईल.असे आश्वासन केसरकर यांनी दिले.

---

## बीड शहरात चोरांचा धुमाकूळ पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी – सारंग खरात

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये मित्र नगर , अंकुश नगर , दिलीप नगर , रायगड कॉलनी , चाणक्यपुरी सह इतर परिवारात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे .या भागांतील नागरीकांना रात्र रात्र जागून काढावी लागत आहे .त्यामुळे पोलिसांनी या भागांमध्ये रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी विद्यार्थी सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष सारंग खरात यांनी केली आहे .



चोरट्यांचे टोळके फिरत असल्याचे बीड शहरातील बर्याच भागांतील सी सी टिव्ही कॅमेरें मध्ये निदर्शनास आल्याने नागरिकांमध्ये एकच भितीचे वातावरण पसरले आहे .त्यामुळे लवकरात लवकर या चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी सारंग खरात यांनी केली आहे . तसेच ते म्हणाले की या भागांमध्ये दररोज चोरटे येत असल्यामुळे नागरीकांना रात्र जागून काढावी लागत आहे .तसेच चोरांच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले आहे .यामुळे पोलिसांनी रात्रीची गस्त घालून चोरांना लवकरात लवकर जेरबंद करावे अशी मागणी जिल्हाध्यक्ष सारंग खरात यांच्यासह बीड शहरातील नागरिकांनी केली आहे .

---

## तंत्रशिक्षणात ‘योगेश्वरी’ महाराष्ट्रात अग्रेसर

### योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षेत घवघवीत यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अभियांत्रिकी पदविका उन्हाळी सत्र परीक्षा–२०२४ निकालामध्ये योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृ. पु. चौसाळकर यो. पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी संस्थेचे नाव महाराष्ट्रात उज्वल केले आहे. यामध्ये तृतीय वर्षात ९०% पेक्षा अधिक गुण घेऊन विद्यार्थ्यांनी नामवंत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात थेट द्वितीय वर्षास आपला प्रवेश निश्चित केला आहे.**

यामध्ये प्रथम वर्ष संगणक अभियांत्रिकी पदविका वर्गातून सूर्यवंशी श्रुतिका (९४. ८२%), प्रथम, तिडके विशाखा (९३.४१%) द्वितीय, तिवारी प्रबल (९२.९४%) तृतीय. द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी पदविका वर्गातून देशमुख स्नेहा (८९.८७%) प्रथम, लांडगे अनिश्का(८९.०७%) द्वितीय, जाधव चैतन्य (८५.२०%) तृतीय. तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी विभागातून पेटेवार आदित्य (९१.३१%) प्रथम, तिडके रोहन (८८.३५%) द्वितीय, फड माणिक (८८.२४%) तृतीय

प्रथम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून मुळे अंकिता (९०.८९%) प्रथम, सस्ते तेजस्विनी (८७.२२%) द्वितीय, पवार सुस्मिता (८५.३३%), तृतीय, द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून भांगे ज्ञानेश्वर (८४.५०%). प्रथम, मुंडे नागनाथ (७९.६३%) द्वितीय, लांडगे अपेक्षा (७८.५०%) तृतीय. तृतीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी वर्गातून नाईकवाडे प्रतीक्षा (९१.३३%) प्रथम, बनाळे सुदर्शन (८९.२२%) द्वितीय, फिसरेकर श्रेयश (८८.८९%) तृतीय.

प्रथम वर्ष यंत्र अभियांत्रिकी वर्गातून राऊत रोहिणी (८८.४४%) प्रथम, चौघुले निलेश (८६.२२%) द्वितीय, हारे अश्विनी (८४%) तृतीय, द्वितीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी पदविका वर्गातून, पवार निकिता (८३.५०%) प्रथम, हाके अहिल्या (८३%) द्वितीय, कत्राळे शुभांगी (८०.६३%) तृतीय, तृतीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी वर्गातून मगर अनिकेत (९४.५२%) प्रथम, सटाले पवन (९३.८९%) द्वितीय, मस्के वीरेंद्र (९०.४४%) तृतीय.

प्रथम वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून जाधव पल्लवी (८३.२२%) प्रथम, सरवदे साक्षी (८२.२२%) द्वितीय व वेदपाठक पार्थ (७९.६७)%) तृतीय., द्वितीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून बिराजदार अभिषेक (८४.४७%) प्रथम, दळवे परमेश्वर (८४.००%) द्वितीय, शेटे ऋतुराज (७४.९४%) तृतीय, तृतीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून भांगे प्रथमेश (७९.११%) प्रथम, शेळके अश्वमेध (७६.४४%) द्वितीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

कु.विशाखा तिडके व चि.प्रबल तिवारी यांनी गणित विषयात तर कु.अश्विनी हारे व कु.रोहिणी राऊत या विद्यार्थ्यांनी इंजिनिअरींग मेक्यानिक्स विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. विभागप्रमुख प्रा. रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट, प्रा.अतुल फड,प्रा.श्याम गडदे प्रा. बप्पासाहेब सोनवणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास,का. उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर, सचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,संचालक प्रताप पवार कृ. पु.चौसाळकर यो.पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.

---

## रा.कॉं.चा संघटनशक्ती मजबूत करण्यावर भर बीडमधील कार्यकर्त्यांना कार्यकारिणीत स्थान

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आगामी निवडणुका लक्षात घेता बीड जिल्ह्यात संघटनशक्ती मजबूत करण्यावर भर दिला आहे. शहरातील संपर्क कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय बैठकीत पक्षाच्या डॉक्टर, लीगल, अल्पसंख्यांक सेलच्या पदाधिकाऱ्यांना मंगळवारी (दि.२) नियुक्ती देण्यात आल्या. यावेळी प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, बीड जिल्हा महिला आघाडी निरीक्षक वैशालीताई पाटील, रा.कॉं.चे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार, महिला आघाडीच्या प्रदेश सचिव संगीताताई तुपसागर यांच्यासह प्रदेश जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुभाष सपकाळ, लीगल सेलच्या



जिल्हाध्यक्ष ड.नागेश तांबारे, डॉक्टर सेलच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश शिंदे, अल्पसंख्याक सेलच्या शहराध्यक्षपदी माजेद खाजमिया कुरेशी, बीड जिल्हा सरचिटणीसपदी मोहम्मद इसाक मोहम्मद मुसा, जिल्हा संघटकपदी अहेमदोद्दीन हमीदोद्दीन सिद्दिकी, तालुकाध्यक्षपदी शेख समीर शेख मुसा, तालुका उपाध्यक्षपदी जावेद शेख चॉंद आदींच्या निवडी करण्यात आल्या.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसची संघटनशक्ती मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. दरम्यान, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस नाईकवाडी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख एकबाल निसार अहेमद यांच्या मान्यतेने अल्पसंख्याक सेलच्या निवडी करण्यात आल्या. तसेच, वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर व लीगल सेलच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीपत्र, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा ड.प्रज्ञाताई खोसरे, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख एकबाल निसार अहेमद, युवक जिल्हाध्यक्ष सुशांतसिंह पवार, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंद देशमुख, कार्यालयीन चिटणीस महादेव धांडे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे यांच्यासह विविध सेलचे प्रदेश, जिल्हा,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई – विधानपरिषद सदस्यपदी लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आज मुंबई येथे लोकनेत्या मा.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांची भेट घेऊन सत्कार करताना आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी),अक्षय भैय्या मुंदडा, शरद भैय्या इंगळे.**



**बीड:–उमरद(ज)चे माजी सरपंच दिलीप आहेर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना पत्रकार संदिप बेदरे, सतीश बहीर, मुख्याध्यापक प्रदीप जगताप, अर्जुन दळे, चंद्रकांत साळुंके, कमलाकर बहीर, विकास चित्रे, प्रशांत लहूरीकर आदि.**



# साईराम मल्टीस्टेट्च्या ठेवीदारांचे पुजा मोरे यांना साकडे

## पूजा मोरेंनी नेतृत्व केल्यास आंदोलनाला येणार धार

तलवाडा । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यातील मल्टिस्टेट बँका डबघाईला आल्या असून अनेक बँकांना कुलूप लागले आहे. परिणामी ठेवीदारांचे पैसे या बँकांमध्ये अडकून पडले आहेत. हे पैसे ठेवीदारांना परत मिळावे यासाठी आंदोलने सुरु आहेत. या आंदोलनाला चांगले स्वरुप मीळावे यासाठी काल साईराम मल्टास्टेट च्या ठेवीदारांनी एक बैठक आयोजित केली होती त्या बैठकीत रा.कॉ.कीसान आघाडीच्या अध्यक्षा कु. पुजाताई मोरे यांनी अश्या ठेवदारांसाठी पुढाकार घ्यावा असे साकडे घातले आहे. यावर ठेवीदारांची बैठक घेवुन तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा पुजाताई मोरे यांनी दिला आहे. बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट या बँकेत हजारो ठेवीदारांनी आपल्या ठेवी रोख स्वरूपात ठेवल्या होत्या. परंतु गेल्या सहा महिन्यांपासून बँकांचे व्यवहार कोलमडून पडले, बँका डबघाईला गेल्या आणि अखेर त्यांना कुलूप देखील लागले. यामध्ये बँकेसोबतच ठेवीदारांनाही आर्थिक झळ सोसावी लागत आहे.सर्व मल्टीस्टेट बँकांना कुलूप लागल्याने कोट्यावधी रुपयांच्या ठेवी या बँकांमध्ये अडकून पडल्या आहेत. याच ठेवी ठेवीदारांना परत मिळाव्यात यासाठी प्रशासनासह शासनाकडे देखील पाठपुरावा केला जात आहे. परंतु अद्याप ठेवीदारांना त्यांचे पैसे मिळालेले नाहीत. बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम बँक यासह अनेक पतसंस्था आणि मल्टीस्टेट बँक ठेविदारांचे पैसे घेऊन बंद पडल्या आहेत. बँकेचे अध्यक्ष, संचालक यानंतर फरार झाले आहेत. यामुळे पैसे मिळविण्यासाठी आता ठेविदार आक्रमक झाले आहेत. दरम्यान आम्ही जगावं कसं? असा प्रश्न उपस्थित करत आमच्या आंदोलनाचे नेतृत्व करून ठेवी मीळवुन द्यावे अशी मागणी साईराम अर्बनच्या ठेवीदारांनी पुजाताई मोरे यांच्याकडे केली आहे.

पुजाताईंचे आंदोलनाने आंदोलनाला धार येणार

पुजाताई मोरे यांच्या अनेक आंदोलने महाराष्ट्रात गाजलेले आहे शेतकऱ्यांसाठी केलेले आंदोलनात त्यांना अटक ही झाली होती तर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काळे झेंडे दाखवुन आपल्या नेतृत्वाची ओळख राज्याला दाखवुन दिली होती त्यामुळे साईराम अर्बन च्या विरोधातील आंदोलनाचे नेतृत्व पुजाताई मोरे यांनी केल्यास आंदोलनाला यश मीळेल अशी आशा ठेवीदार व्यक्त करू लागले आहे.



### ठेवीदारांची फसवणूक अत्यंत दुर्दैवी - पूजा मोरे

पूजाताई मोरे यांनी ठेवीदारांची ही फसवणूक अत्यंत दुर्दैवी असून ठेवीदारांच्या हक्काच्या पैश्यांसाठी त्यांनाच संघर्ष करावा लागणे हे चित्र चांगले नाही. मल्टिस्टेट बँकांनी जबाबदारांनी वागणे गरजेचे आहे. ठेवीदारांच्या भावना मी समजून घेतल्या आहेत त्यांचे हक्काचे पैसे त्यांना मिळावेत ही माझी देखील भावना आहे त्यासाठी त्यांना साथ देण्याची मानसिकता माझी आहे असे पूजा मोरे यांनी प्रतिपादन केले.



# ग्रामसेवक साहेब नाळवंडी गावाला पाणी द्या पाणी

नाळवंडी । प्रतिनिधी

ग्रामसेवक साहेब नागरिकांना पाणी द्या पाणी,बीड शहरा पासून अवघ्या आठ ते नऊ किलोमीटर अंतरावर असलेले सर्कलमधिल नाळवंडी हे गाव,तब्बल एक महिना झालं या गावाला कसल्याही प्रकारची पाण्याची व्यवस्था नाही,,वारंवार ग्रामसेवक यांना तोंडी सांगून ही ग्रामसेवक हे लक्ष देण्यास तयार नाहीत,नागरिकांना उडवा उडवीचे उत्तर मिळत आहे,अजून किती दिवस सहन करणार हा अन्याय,त्याच अनुषंगाने आज समस्थ गावकऱ्यांच्या वतीने,जिल्हाधिकारी कार्यालय बीड तसेच जिल्हा परिषद विभाग बीड,तसेच,पंचायत समिती विभाग बीड आणि ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी यांना पाण्या साठी निवेदन देण्यात आले,ग्रामपंचायत च्या आडमुठे पणाच्या भूमिकेमुळे गलथंड कारभारामुळे तलावामध्ये आणि ग्रामपंचायत आधीग्रहण केलेल्या बोअर मध्ये पाणी असून देखील नागरिकांना पाणी पुरवठा होत नाही या मुळे नाळवंडी मधील रमाई नगर,भीमनगर,लहुजी नगर,येथे राहत असलेल्या नागरिकांना पाण्यासाठी कसरत करावी लागत आहे,,नागरिक ग्रामसेवक यांना पाण्याच्या बाबतीत विचारपूस करण्यासाठी गेल्यावर ग्रामपंचायत मद्ये निधीच शिल्लक नाही असे व उडवा उडवीचे उत्तर मिळत आहेत यामुळे ग्रामसेवक यांना कंटाळून नागरिक त्रस्त झाले आहेत,ग्रामसेवक यांच्या हलगर्जी पणा मुळे पाणी पुरवठा होत नाही,आज या सर्व त्रासाला कंटाळून ग्रामस्थांच्या वतीने आज थेट निवेदन देण्यात आले,या निवेदनातून ग्रामसेवक यांना पाच दिवसाचा कालावधी दिलेला असून पाच दिवसात या गावासाठी पाणी उपलब्ध नाही झाले तर जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्यात येईल,आणि याची सर्वस्वी जबाबदारी आपली असेल असे या निवेदनातून ग्रामस्थांनी नमूद केले.

# कारवाईतील जप्त गाईला जीवदान

## देव तारी त्याला कोण मारी !

बीड । प्रतिनिधी

अतिशय क्रूड पद्धतीने एकाच वाहनात कोंबून एका गाभण गाईला चालवले असताना गोरक्षकाच्या मदतीने पोलिसांनी कारवाई करून सदरील जनवारे जप्त केली व आंबेजोगाई येथील गोशाळेत सोडण्यात आली यानंतर मरणाच्या दारात असलेल्या गाभण गाय मशीनच्या साह्याने जीवदान देण्यात आले देवतारे त्याला कोण मारी अशीच काहीशी घटना घडली आहे. गत काही दिवसापूर्वी स्थानिक गोरक्षक , पोलीस प्रशासन यांच्या सहकार्याने प्राण्यांना क्रूरतेने दाटीवाटीने कोंबून त्रास होईल, या पद्धतीने वाहतूक करीत घेवून जात असताना पकडून वाहन व चालक व इतर व्यक्तिवरती केलेल्या कार्यवाही मधील जप्त पशुधन हे गोशाळेत सोडली होते. त्यापैकी एक गाय व तीच्या पोटातील वासरू हि दोघेही अत्यवस्थेत होती. कार्यवाही नंतर दोन दिवस ती वाहनात बसून होती व गोशाळेत आल्यास ही बसून होती. पोटात वासरू होते. सदरील गाईला व वासराला काही होवू नये म्हणून प्रयत्न करण्यात आले. मात्र, देव तारी त्याला कोण मारी, असे काहीसे घडले आहे. गोशाळेत तिला आणल्या नंतर तिला मशीन चे साह्याने उचलून बसवत होते. शेवटी तिने छोट्याश्या गोंडस बाळास जन्म दिला असून यातनेतून मुक्त होत थोडी हलकी झाली. गाय व बाळ सध्या सुखरूप आहे. आपल्या सर्वांच्या आशीर्वाद व प्रेमाने ती व वासरू सुखरूप आहे. गाय वाचविण्याचे पुण्य प्रयत्न करणाऱ्या गोरक्षकांना ऍड ,अशोक मुंडे यांना प्राप्त झाले आहे.



# डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांना एसकेएच महाविद्यालयामध्ये आदरांजली अर्पण

बीड । प्रतिनिधी

येथील सोनाजीराव क्षीरसागर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये होमियोपँथीचे जनक डॉ सँम्युअल हैनिमन यांच्या १८१ व्या पुण्यतिथि निमीत्त महाविद्यालयाचे सल्लागार डॉ अरुण भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली होमिओपॅथी वैद्यक शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश पांगारकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. गणेश पांगरकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित करतांना डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांच्या जीवन कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.



तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल यांनी होमियोपँथीच्या जन्माच्या वेळी असणारी सामाजिक, आर्थिक, राजनैतिक परिस्थिति व त्याचा होमियोपँथीवर होणारा दुरगामी परीणाम या बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला डॉ. अंजली पंगारकर, डॉ. उषा मस्तुद, डॉ. पुनम शिंदे, डॉ अनीस अहमद, डॉ. अमृता आगवान, डॉ नवाज शेख तसेच, विद्यार्थी प्रतिनिधी धनंजय तागड ,विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ द्न्यानेशवर जोशी यानी तर आभार प्रदर्शन सौ संध्या गौशाल यानी केले.

# नामदेवराव क्षिरसागर यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्राची हानी; उमेश मोगरे कर

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे आग्रजांनी दैनिक चंपावती पत्राचे संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने बीड जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाड्यातील पत्रकार क्षेत्राची हानी झाली असल्याचे प्रतिमान पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांनी केले ते येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संपादक प्रदीप कुलकर्णी हे होते



पुढे बोलत ते म्हणाले की नामदेव क्षीरसागर यांनी साठ वर्षापेक्षा जास्त वर्ष या पत्रकार क्षेत्रात घालवले असून त्यांनी साठ वर्षांपूर्वी दैनिक चंपावती पत्र हे वर्तमानपत्र काढून जिल्ह्यातील प्रश्नांची मांडणी या वर्तमानपत्रात करून ते सोडवण्यासाठी वेळप्रसंगी आंदोलने केली तसेच आपल्या वर्तमानपत्रातून कोणाचेही चारित्र्य हरण होणार नाही याची काळजी घेत पत्रकारिता केली विशेष म्हणजे त्यांचे वर्तमानपत्रावर एवढे प्रेम होते की त्यांचे निधन होण्याअगोदर त्याने आपला अंक प्रकाशित केला होता आशा या महान संपादकास त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपण पत्रकारिता करावी हे त्यांना श्रद्धांजली ठरेल असे प्रतिपादन केले यावेळी साप्ताहिक परिसर चे संपादक प्रदीप कुलकर्णी यांनी आपले श्रद्धांजलीपर विचार मांडताना मला पत्रकार म्हणून कै. नामदेवराव यांनी आपल्या दैनिकात संधी देऊन मला मार्गदर्शन केले त्यामुळेच आज मी पत्रकारिता क्षेत्रात स्वतःचे वर्तमानपत्र चालवत असून त्यांच्यामुळेच मी घडलो असल्याचे सांगितले त्यानंतर तुकाराम बापू येवले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नामदेवराव यांच्या पत्रकारितेचा आदर्श आपण सर्वांनी घ्यावा असे आवाहन उपस्थित त्यांना केले या कार्यक्रमावर मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष हरीश यादव, सुधाकरराव देशमुख, कमलेश जाब्रश, महेंद्र मस्के, तानाजी शिरसाट, परमेश्वर सोळंके, विष्णू उगले, अरविंद ओव्हाळ, वैजनाथ धायतिडक , राजरत्न डोंगरे, दिनकर शिंदे, राज गायकवाड, दत्ता येवले यांच्यासह बहुसंख्य पत्रकार उपस्थित होते.

# अहिल्यादेवी नगर ठिकाणी केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर हे आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर ,सतत सामाजिक राजकीय क्षेत्रात अग्रेसर असतात . नाम फाउंडेशन चया वतीने गावातील नदीचे खोलीकरण वड्याचे खोलीकरण, महिलासाठी सॅनिटरीट्रीपेड ची वाटप, ४०० नारळाचे मोफत झाड वाटप, गावात रक्तदान शिबिरे, स्त्री रोग डॉक्टर तपासणी शिबिरे, नेत्र तपासणी शिबीर, गावातील शेतकऱ्यांसाठी विविध स्कीमची ऑनलाईन शिबिर, गावातील मुलांसाठी अद्यावत अशी अभ्यासिका, गावात पाणी पिण्यासाठी फिल्टर, गावातील उद्योजक, गव्हर्नमेंट सर्विस ला लागलेली मुलं यांना गाव रत्न व विश्वकर्मा पुरस्कार ने सन्मानित करून



तरुणांना उद्योगासाठी प्रेरणा देण्याचे काम केले, सरपंच परमेश्वर तळेकर यांनी केले आहे, याच सामाजिक कार्याची पावतीसरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने, हवामान तज्ञ पंजाबराव डक. यांच्या हस्ते हा आदर्श सरपंच पुरस्कार सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, माऊली संकुल सभागृह सावेरी रोड अहमदनगर येथे पुरस्कार देण्यात आला सर्व महाराष्ट्रातील आदर्श सरपंच यामध्ये निवडले गेले आहेतयावेळी महाराष्ट्रातील सर्व दिग्गज सरपंच मान्यवरांची उपस्थिती होती

# मराठवाड्यातून धनगर समाजाला कधी भेटणार विधान परिषदेवरती न्याय.. बाळासाहेब सोलंकर

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्याच्या राजकारणामध्ये धनगर समाजाला केंद्रबिंदू मानल जात. भारतीय जनता पार्टीने फक्त मतासाठीच या समाजाचा वापर केला जातो का..? मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर धनगर समाज असून या समाजाची आर्थिक परिस्थिती ,राजकीय परिस्थिती ,सामाजिक परिस्थिती ,प्रचंड हालाखीची आहे तरी या समाजाला न्याय भेटण्यासाठी मराठवाड्यातून एखाद्या तरी धनगर समाजाला विधानपरिषदेवरती न्याय द्यावा अशी आमची विनंती आहे. ज्या समाजाने तुम्हाला देशात आणि महाराष्ट्रात गुलाल लावला त्याच समाजाला मराठवाड्यात किती दिवस वंचित ठेवणार.



येणाऱ्या काळात मराठवाड्यामध्ये धनगर समाजाचा विचार केला नाही तर हा धनगर समाज तुम्हाला घरी बसल्याशिवाय राहणार नाही.

मराठवाड्यामध्ये भारतीय जनता पार्टीला चांगले दिवस येण्यासाठी या धनगर समाजाचा मोठा सिंहाचा वाटा आहे या सर्व गोष्टीचा विचार करून मराठवाड्यातून या समाजाला विधानपरिषदेवरती न्याय द्यावा अन्यथा हा समाज आपल्याला घरी बसल्याशिवाय राहणार नाही.

# हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

## धोंडराई सर्कलमध्ये नायक युथ फाउंडेशनच्या वतीने एक हजार वृक्षारोपण

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : १ जुलै रोजी कृषी दिन म्हणजे दिवंगत मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करून समाजबांधवांनी वृक्षारोपण केले आहे. १९६२ ते १९७५ या दीर्घ कालावधीसाठी महाराष्ट्राला लाभलेले मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक साहेब हे १९६३, १९६७ व १९७२ असे तिनदा बिनविरोध मुख्यमंत्रीपदी निवड होणारे हरित क्रांतीचे जनक, महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गेवराई तालुक्यात नायक युथ फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले आहे. दि.१ जुलै रोजी जयंती उत्साहात साजरी करून, त्यानिमित्त नायक युथ फाउंडेशन च्या वतीने गेवराई तालुक्यातील राजपिंपरी सर्कलमध्ये एक हजार वृक्षारोपण करण्यात आले आहे. समाजबांधवांनी एक झाडे लावून समाजासमोर आदर्श ठेवत जयंती साजरी केली आहे. एक हजार वृक्ष लागवडीचा कार्यक्रमाचे आयोजन नायक युथ फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले होते. त्यांच्या स्वप्नातील धवलक्रांती व हरित क्रांती गतिमान होण्यासाठी निसर्ग संतुलित असणे आवश्यक आहे. त्याकरिता वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे. महानायक वसंतराव नाईक यांची आठवण म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या बांधावर व सर्वांनी घर परिसरात वृक्षारोपण केल्यास त्यांची खरी जयंती साजरी होईल, असे समाजबांधवांनी सांगितले. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गेवराई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस



निरीक्षक प्रविणकुमार बांगर व गेवराई नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके हे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.पी.टी. चव्हाण, गोर सेना छत्रपती संभाजीनगर विभागीय सचिव सतिश पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड, बंजारा क्रांती दल तालुकाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, गोर सेना तालुकाध्यक्ष संजय राठोड व नायक युथ फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT